**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज**

द्वितीय अपिल क्र.रामाआ :-५७३+९१७/२०२४/सोलापूर

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे - १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| १.अपिलकर्ता संस्था यांचेमार्फत महिबूब चांद नदाफ<br>२.संजय सारंग गायकवाड | मुख्य लिपीक, अधिन सहाय्यक निबंधक कार्यालय, सहकारी संस्था, दक्षिण सोलापूर | सहाय्यक निबंधक, सहाय्यक निबंधक कार्यालय, सहकारी संस्था, दक्षिण सोलापूर |

**( सुनावणी दिनांक - १२/०८ /२०२५ )**

श्री.गायकवाड यांनी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचेकडे दि.२४.०१.२०२४ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम १९(३) अन्वये प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाप्रमाणे माहिती मिळाली नाही, याकारणास्तव द्वितीय अपील दाखल केले आहे. संस्थेमार्फत श्री.महिबूब चांद नदाफ यांनी दि.०१.०२.२०२४ रोजी आयोगाकडे दाखल केलेले अपिल हे प्रथम अपिल अधिकारी यांनी दि.२१.१२.२०२३ रोजी दिलेल्या आदेशाविरुध्द आहे. सदर व्दितीय अपीलाची सुनावणी घेणेत येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वादसूची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणेत आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी विद्यमान व तत्कालीन जन माहिती अधिकारी तसेच विद्यमान व तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी हजर आहेत. अपिलकर्ता गैरहजर आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपीलार्थी श्री.संजय सारंग गायकवाड यांनी दि.०४.१०.२०२३ च्या माहिती अर्जात जन माहिती अधिकारी यांचेकडे समर्थ ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था म.कंदलगाव ता.दक्षिण सोलापूर या संस्थेची १ ते ३ मुद्यांची माहिती मागितलेली आहे.

आज रोजी सुनावणी दरम्यान तसेच श्री.संजय सारंग गायकवाड यांच्या लेखी निवेदनामध्ये अवगत केले की, “आजअखेर माहिती मिळाली नाही . जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचेवर कारवाई करणेत यावी.”

आज रोजी सुनावणी दरम्यान तसेच यांच्या लेखी निवेदन मध्ये जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, “दि.०५.१०.२०२३ च्या पत्राने माहिती सादर करणेबाबत संस्थेस कळविले आहे. संस्थेने दि.२०.१०.२०२३ च्या पत्राने कळविले की, संस्थाना माहिती अधिकार लागू नाही. तरीही केलेली मागणी ही माहिती अधिकार अधिनियम २००५ कलम ८ (१) अन्वये वाणिज्य क्षेत्रातील विश्वासर्हता,व्यापारी विषयक गुपिते, किंवा बौध्दीक संपदा यांच्यासह जी माहिती उघड केल्याने त्रयस्थ पक्षाच्या स्पर्धात्मक स्थानाला हानी पोहोचेल


Scanned with OKEN Scanner

अशी माहिती प्रकट करण्याला अपवाद आहे. तसेच माहिती अधिकार अधिनियम २००५ ८(१) (जे) अन्वये मागितलेली माहिती ही कोणत्याही सार्वजनिक कामकाजाशी किंवा हितसंबंधाशी कोणताही संबंध नसेल किंवा जी माहिती देण्यामुळे एखाद्या व्यक्तीच्या खाजगी पणावर अतिक्रमण होणार असेल तर ती माहिती संस्था किंवा निबंधकास देणे बंधनकारक असणार नाही व मागणी केलेली माहिती पाहता ती माहिती अधिकार कायद्याशी सुसंगत नाही किंवा त्याचे उल्लंघन करणारे आहे, असे कळविले आहे. संस्थेने कार्यालयास सादर केलेल्या पत्राची प्रत दि.०१.११.२०२३ रोजी अपिलार्थी यांना देणेची कार्यवाही केली आहे. प्रथम अपिल आदेशानंतर दि.१२.०१.२०२४ च्या पत्राने अपिलार्थी यांना उपलब्ध माहिती दिली आहे. "

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान तसेच त्यांच्या लेखी निवेदनामध्ये अवगत केले की, "अपिलार्थी यांच्या प्रथम अपीलावर सुनावणी घेऊन दि.२१.१२.२०२३ रोजी माहिती देणेचा निर्णय पारित केला आहे."

मुंबई उच्च न्यायालयाच्या डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप बँक लि. विरुध्द राज्य माहिती आयोग यामध्ये मा.उच्च न्यायालयाने खालीलप्रमाणे निर्णय दिला आहे.

माहिती अधिकार कायद्याच्या कलम ४ आणि ५ मध्ये सार्वजनिक प्राधिकरणांच्या जबाबदाऱ्यांबद्दल माहिती दिली आहे आणि सार्वजनिक प्राधिकरणाला सार्वजनिक माहिती अधिकारी इत्यादी नियुक्त करण्याचे निर्देश दिले आहेत. कलम ६ अंतर्गत माहिती मिळविण्यासाठी सार्वजनिक प्राधिकरणाकडे विनंती करता येते. जर ते सार्वजनिक प्राधिकरण नसेल, तर माहिती अधिकार कायद्याअंतर्गत माहिती मागता येत नाही. अर्जदार सहकारी संस्थेचा भागधारक आणि सदस्य असल्यास सोसायटी कायद्याच्या कलम ३२ अंतर्गत माहिती मिळविण्यासाठी अर्ज करण्याचा अधिकार आहे आणि जर त्याने असा अर्ज केला तर संस्था कायद्यानुसार माहिती देण्यास कायदेशीररित्या बांधील असेल.सोसायटी कायद्याअंतर्गत सहकारी संस्थांच्या भागधारकांना माहिती मागण्याचा अधिकार देण्यात आला आहे.

मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने याचिकाकर्ते बँक ही माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २(ज) अन्वये सार्वजनिक प्राधिकरण नसल्याचे स्पष्ट करून सहकारी संस्थेला माहिती अधिकार लागू नसल्याचे नमूद करून राज्य माहिती आयोग आदेश रद्द केला आहे.

उपलब्ध अभिलेखावरून दिसून येते की, समर्थ ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या. ही देखील महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० अंतर्गत नांदणीकृत असलेली एक सहकारी पतसंस्था आहे. अपिलार्थी हे समर्थ ग्रामीण सह.पतसंस्था कंदलगांव या संस्थेचे सभासद नाहीत.सबब,मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाच्या आदेशाच्या आधारे अपिलार्थी श्री.गायकवाड यांचे अपिल फेटाळण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

प्रस्तुतचे दोन द्वितीय अपीले निकाली काढण्यात येत आहेत.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

जावक क्र. ५७३+९१७/२०२४/सोलापूर 10898/2025 दिनांक - 16/1/25



Scanned with OKEN Scanner